# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**2 JULY, 2018**

[Time : 14-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना :** गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करू नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती अंतराने टंकलिखित करा.

[गुण : ४०]

घराला आर्थिक मदत मिळवून देण्याच्या उद्देशानं अनेक गृहिणींनी आपल्या घरात पाळणाघरं सुरु केली. घर थोड ऐसपैस असेल तर उत्तम. अनेकींनी दहा बाय दहाच्या घरातही पाळणाघरं चालवून घराला हातभार लावला. नोकरदार बायांना पसंत असो वा नसो, हा पर्याय स्वीकारावाच लागला. घरगुती पाळणाघरांमध्ये मुलांच्या संख्येवर मर्यादा येते पण कमी मुलं असल्याने आपल्या मुलाकडे “मावशी” नीट लक्ष देतील याचं समाधान आईला असतं. अनेक नोकरदार स्त्रिया सासू-सासऱ्यांवर ताण नको म्हणून काही तास मुलाला पाळणाघरात ठेवतात. काही घरांमध्ये मुलाला पाळणाघरात ठेवण्यास थेटपणे सांगितलं जातं किंवा आडूनआडून सूचित केलं जातं. पाळणाघरांमुळे अशी ही सोय झाली आहे.

स्वतंत्र इमारत असलेल्या अनेक महिला मंडळांनी ही पाळणाघरं चालू केली. इथं मुलांना सांभाळायला मदतनीस असल्यानं कामाची विभागणी होते. आईला मुलासाठी डबा देणं शक्य नसेल तर अधिकचे थोडे पैसे घेऊन पाळणाघरच जेवणाची सोय करतं. अशा पाळणाघरांमध्ये मदतनीस म्हणून काम करून अनेक महिलांनी आपल्या संसाराचा गाडा रेटला आहे. मुलांना शाळेतून नेण्या-आणण्याची सोयही केली जाते.